# उत्तरेकडील मैदानी प्रदेश – वाळवंट

**अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा**

*१.

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| i. | मरुस्थळ | अ. | उत्तम पशुखाद्य |
| ii. | बाभूळ **[मार्च १६]** | ब. | पायऱ्यांच्या विहिरी |
| iii. | शेळी **[जुलै १५]** | क. | बारखाण |
| iv. | बावडी **[जुलै १५]** | ड. | लोही |
| v. | मोर | इ. | छोटा हौद |
| | | फ. | राष्ट्रीय पक्षी |

**उत्तरे:** (i – क), (ii – अ), (iii – ड), (iv – ब), (v – फ)

२.

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| i. | बारखाण | अ. | रब्बी पिके |
| ii. | भागर | ब. | तळी |
| iii. | जोजोबा | क. | शुष्क प्रदेश |
| iv. | जोहड | ड. | वालुकागिरी |
| v. | गहू | इ. | तेलनिर्मिती |
| | | फ. | खरीप पिके |

**उत्तरे:** (i – ड), (ii – क), (iii – इ), (iv – ब), (v – अ)

## प्र.२. थोडक्यात उत्तरे लिहा. (स्वयंअध्ययनासाठी प्रश्न)

### ३.० प्रस्तावना

**१. उत्तरेकडील मैदानी प्रदेशाचे कोणत्या तीन भागांत विभाजन होते?**

**उत्तर:** उत्तरेकडील मैदानी प्रदेशाचे खालील तीन भागांत विभाजन होते:

i. राजस्थान - वाळवंट

ii. पश्चिमी मैदान (पंजाब-हरियाणा)

iii. अ. मध्यवर्ती मैदान

ब. त्रिभुज प्रदेश

क. पूर्वीय मैदान

**२. उत्तरेकडील मैदानी प्रदेशाने किती चौकिमी क्षेत्र व्यापले आहे?**

**उत्तर:** उत्तरेकडील मैदानी प्रदेशाने ६,७७,६३८ चौकिमी इतके क्षेत्र व्यापले आहे.

**३. भारतीय महाकाव्यांमध्ये राजस्थान वाळवंटाला काय म्हणून संबोधले आहे?**

**उत्तर:** भारतीय महाकाव्यांमध्ये राजस्थान वाळवंटाला लवणसागर (मिठाचा समुद्र) असे संबोधले आहे.

**४. राजस्थानने किती चौकिमी क्षेत्रफळ व्यापलेले आहे?**

**उत्तर:** राजस्थानने ३,४२,२३९ चौकिमी इतके क्षेत्रफळ व्यापलेले आहे.

## ३.१ प्राकृतिक रचना

**५. राजस्थान बागर म्हणजे काय?**

**उत्तर:** राजस्थान बागर म्हणजे मरुस्थळाचा पश्चिम भाग आणि पूर्वेला अरवली पर्वतरांगांच्या मधील अंशत: शुष्क प्रदेश. हा प्रदेश लुनी आणि घग्गर नद्यांचा प्रदेश आहे.

**६. राजस्थानच्या बागर प्रदेशाच्या पश्चिमेला काय आहे?**

**उत्तर:** राजस्थानच्या बागर मैदानी प्रदेशाच्या पश्चिमेला लहान लहान टेकड्या आहेत.

**७. कोणत्या नदीच्या प्रवाहामुळे राजस्थानच्या प्रदेशामध्ये जलनिस्सारण होते? या नदीची वाहण्याची दिशा कोणती?**

**उत्तर:** लुनी नदीच्या प्रवाहामुळे राजस्थानच्या प्रदेशामध्ये जलनिस्सारण होते. लुनी ही नदी अरवली पर्वतरांगांतील पुष्कर दरीतून उगम पावते आणि कच्छच्या रणामध्ये वाहत जाते.

**८. राजस्थानच्या मैदानी प्रदेशामधील जलनिस्सारण प्रक्रियेबद्दल लिहा.**

**उत्तर:** राजस्थानच्या मैदानी प्रदेशाचे जलनिस्सारण लुनी नदीमुळे होते. आग्नेय भाग वगळता बहुतेक प्रदेशाचे जलनिस्सारण त्याच प्रदेशात होते. ती प्रणाली तिथेच संपुष्टात येते व कुठल्याही समुद्राला जाऊन मिळत नाही.

**९. बारखाण म्हणजे काय?**

**उत्तर:** चंद्रकोरीच्या आकाराच्या तसेच वाऱ्याचा वेग आणि दिशा यांनुसार स्थिती बदलणाऱ्या वाळूच्या टेकड्यांना बारखाण म्हणतात.

**१०. नदीय आणि वातज अपक्षरण म्हणजे काय?**

**उत्तर:** नदीमुळे झालेले अपक्षरण म्हणजे नदीय अपक्षरण आणि वाऱ्यामुळे झालेले अपक्षरण म्हणजे वातज अपक्षरण होय.

**११. कोणत्या प्रक्रियांमुळे राजस्थानचा मैदानी प्रदेश तयार झाला आहे?**

**उत्तर:** राजस्थानचा मैदानी प्रदेश हा घग्गर नदी व वारा अपक्षरण या प्रक्रियांमुळे तयार झालेला आहे.

**१२. राजस्थानच्या कोणत्या भागात वातज अपक्षरणाची प्रक्रिया प्रामुख्याने दिसून येते?**

**उत्तर:** वातज अपक्षरणाची प्रक्रिया राजस्थानातील मरुस्थळीच्या पश्चिम भागात प्रामुख्याने दिसून येते, कारण येथील जमीन विविध प्रकारच्या वाळूच्या टेकड्यांनी व्यापली आहे.

**१३. कोणत्या कारणांमुळे राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात जलनिस्सारण होत नाही?**

**उत्तर:** राजस्थानच्या मैदानी प्रदेशाची भौगोलिक रचना, सपाटभूमी, शुष्क हवामान व वालुकामय मृदा ही वैशिष्ट्ये असल्यामुळे येथे जलनिस्सारण होत नाही.

## ३.३ मृदा

**१४. राजस्थानच्या मैदानी प्रदेशात आढळणाऱ्या मृदेचे प्रकार लिहा.**

**उत्तर:** राजस्थानच्या मैदानी प्रदेशात चार प्रकारच्या मृदा आढळतात:

i. लवणयुक्त वाळवंटातील मृदा

ii. तांबडी वाळवंटी मृदा

iii. पिवळी तपकिरी वालुकामय मृदा

iv. लुनी खोरे आणि घग्गर नदीच्या मैदानी प्रदेशातील जलोढ मृदा

**१५. राजस्थानमधील वालुकागिरींचे स्थलांतर रोखण्यासाठी कोणता कायमस्वरूपी मार्ग अवलंबला जाऊ शकतो?**

**उत्तर:** वालुकागिरींचे स्थलांतर रोखण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग म्हणून वातरोधक जातीच्या वनस्पतींची लागवड केली जाते, यामुळे उष्ण व थंड वाऱ्यांपासून आणि वाळूच्या आक्रमणापासून बचाव होतो.

## ३.४ नैसर्गिक वनसंपत्ती व प्राणिजीवन

**१६. दुर्मीळ होण्याच्या मार्गावर असणारे कोणते वन्यप्राणी राजस्थानमध्ये सापडतात?**

**उत्तर:** भारताच्या इतर भागात दुर्मीळ होण्याच्या मार्गावर असलेले वन्यप्राणी जसे काळवीट, चिंकारा हे राजस्थानच्या वाळवंटात मोठ्या प्रमाणावर आढळतात.

**१७. राजस्थानातील कोणत्या स्थानिक समाजाकडून प्राण्यांना संरक्षण मिळते?**

**उत्तर:** राजस्थानातील बिष्णोई या स्थानिक समाजाकडून प्राण्यांना संरक्षण मिळते.

**१८. राजस्थानच्या वाळवंटात आढळून येणाऱ्या पक्ष्यांची नावे लिहा.**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटात गरुड, बहिरी ससाणा, खरूची, गिधाड, भारतीय रानकोंबडा आणि मोर असे वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी आढळून येतात.

## ३.५ लोकसंख्या आणि वसाहती

**१९. राजस्थानच्या वाळवंटातील लोकांचे मुख्य व्यवसाय कोणते?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटातील लोकांचे मुख्य व्यवसाय शेती आणि पशुपालन हे आहेत.

**२०. कोणती दोन शहरे प्रत्यक्ष राजस्थानच्या वाळवंटात वसली आहेत?**

**उत्तर:** बिकानेर आणि जैसलमेर ही शहरे प्रत्यक्ष राजस्थानच्या वाळवंटात वसली आहेत.

**२१. राजस्थानच्या वाळवंटात लोकसंख्या विरळ असण्याची दोन मुख्य कारणे कोणती?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटात लोकसंख्या विरळ असण्याची दोन मुख्य कारणे म्हणजे प्रतिकूल हवामान आणि अपुरी नैसर्गिक साधनसंपत्ती होय.

**२२. खादिन म्हणजे काय?**

**उत्तर:** पृष्ठभागावरून वाहणारे पाणी शेतीसाठी साठवून ठेवण्याचा राजस्थानमधील बांधकामाचा एक नामी नमुना म्हणजे खादिन होय.

**२३. 'कुई' म्हणजे काय?**

**उत्तर:** अल्प पावसाच्या ठिकाणी झिरपणारे पाणी गोळा करण्यासाठी व पावसाचे पाणी साठवण्यासाठी

टाक्यांजवळ १० ते १२ मीटर खोल खड्डे खणले जातात, त्याला 'कुई' असे म्हणतात.

## ३.६ आर्थिक विकास

**२४. राजस्थानमधील जमिनीचा दर्जा गंभीररीत्या कशामुळे खालावला आहे?**

**उत्तर:** प्राण्यांच्या जास्त संख्येमुळे अतिचराई, वारा आणि पाण्याद्वारे अपक्षरण तसेच खाणकाम आणि इतर उद्योगधंद्यांमुळे येथील जमिनीचा दर्जा गंभीररीत्या खालावला आहे.

**२५. राजस्थानमधील विहिरी किती खोलीच्या असतात?**

**उत्तर:** राजस्थानमधील विहिरी ३० मीटर ते १२० मीटर इतक्या खोलीच्या असतात.

**२६. राजस्थानच्या वाळवंटातील विहिरींमध्ये कोणत्या प्रकारचे पाणी आढळते?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटातील विहिरीचे पाणी नेहमीच मचूळ आणि लवणयुक्त असते. गोड्या पाण्याच्या विहिरीचे प्रमाण अत्यल्प आहे.

**२७. राजस्थानातील खरीप पिकांची नावे लिहा.**

**उत्तर:** राजस्थानात बाजरी, कडधान्ये, ज्वारी, मका, तीळ आणि भुईमूग ही खरीप पिके घेतली जातात.

**२८. राजस्थानातील रब्बी पिकांची नावे लिहा.**

**उत्तर:** गहू, मोहरी, कापूस आणि जिरे ही राजस्थानातील रब्बी पिके आहेत.

**२९. राजस्थानच्या वाळवंटी भागात मुख्यत: कोणत्या साधनाद्वारे पाणी जलसिंचनासाठी वापरले जाते?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटी भागात मुख्यत: विहिरी आणि टाक्यांद्वारे पाणी जलसिंचनासाठी वापरले जाते.

**३०. राजस्थानमध्ये 'वाळवंट विकास कार्यक्रम' ही योजना का राबविण्यात आली आहे?**

**उत्तर:** 'वाळवंट विकास कार्यक्रम' ही योजना जलसाठ्यांचे नियोजन करण्याकरिता भारत सरकारद्वारा राबविण्यात आली आहे. यात वाळवंटाचा विस्तार तपासणे आणि रहिवाशांचे जीवनमान सुधारणे ही मुख्य उद्दिष्टे आहेत.

**३१. राजस्थानच्या वाळवंटात बैलाच्या कोणत्या जाती आढळतात?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटात कांकरेज, नागौरी, थार्परकर आणि राठी या बैलांच्या जाती आढळतात.

**३२. राजस्थानी वाळवंटी प्रदेशात, दुष्काळाच्या काळात भटके लोक गुरांना चारा कसे उपलब्ध करून देतात?**

**उत्तर:** दुष्काळाच्या काळात भटके लोक मेंढ्यांचे आणि उंटांचे कळप घेऊन दक्षिण राजस्थान किंवा जवळच्या मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्ये गुरे चारण्यासाठी स्थलांतर करतात.

**३३. गुरांच्या कोणत्या जत्रा राजस्थानमध्ये आयोजित केल्या जातात?**

**उत्तर:** मानसर येथील रामदेवजी गुरांची जत्रा, परबतसर येथील तेजाजी गुरांची जत्रा, तिलवाडा येथील मल्लिनाथ गुरांची जत्रा या काही महत्त्वाच्या गुरांच्या जत्रा राजस्थानमध्ये आयोजित केल्या जातात.

**३४. राजस्थानमध्ये कोणते खनिज पदार्थ आढळून येतात?**

**उत्तर:** राजस्थानमध्ये जिप्सम, चिनीमाती, बांधकामाचे दगड, संगमरवर, सोपस्टोन, लिग्नाइट आणि टंगस्टन आढळून येतात.

**३५. राजस्थानमध्ये टंगस्टन कुठे आढळून येते?**

**उत्तर:** राजस्थानमध्ये टंगस्टन हे पाली जिल्ह्यात आढळून येते.

**३६. जोधपूरमध्ये लाल दगड कोणत्या नावाने ओळखला जातो?**

**उत्तर:** जोधपूरमध्ये लाल दगड 'घाटु पथ्थर' या स्थानिक नावाने ओळखला जातो.

**३७. राजस्थानमध्ये लिग्नाइट कोळशाचे साठे कोठे आढळतात?**

**उत्तर:** राजस्थानमध्ये लिग्नाइट कोळशाचे साठे बारमेर, बिकानेर आणि नागौर जिल्ह्यांत आढळतात.

**३८. राजस्थानचे वाळवंट हा सौरऊर्जा निर्मितीक्षम प्रदेश का आहे?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटात वर्षातले बहुतांश दिवस आकाश निरभ्र असल्याने हा सौरऊर्जा निर्मितीक्षम प्रदेश आहे.

## ३.७ पर्यावरणीय समस्या आणि नैसर्गिक आपत्ती

**३९. राजस्थानच्या वाळवंटात संपूर्ण वर्षभर पाण्याचे दुर्भिक्ष्य का असते?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटातील वार्षिक पर्जन्यमान सुमारे १०० ते २५० मिमी इतके अत्यल्प असते, त्यामुळे राजस्थानात संपूर्ण वर्षभर पाण्याचे दुर्भिक्ष्य असते.

**४०. राजस्थानच्या वाळवंटात दुष्काळाची वारंवारता काय आहे?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटात सरासरी प्रत्येक दहा वर्षांत चार वर्षे दुष्काळाची असतात.

**४१. 'आँधी' म्हणजे काय?**

**उत्तर:** राजस्थानच्या वाळवंटातील उन्हाळ्यातील उष्ण धुळीच्या वादळांना 'आँधी' असे म्हणतात.

## प्र.३. टिपा लिहा.

### ३.० प्रस्तावना

### १. उत्तरेकडील मैदानी प्रदेश

**उत्तर:** i. उत्तरेकडील मैदानी प्रदेश हा भारतातील दुसरा सर्वांत मोठा भौगोलिक विभाग आहे.

ii. उत्तरेकडे हिमालय आणि दक्षिणेकडे द्वीपकल्पीय पठारी प्रदेश यांच्यादरम्यान हा प्रदेश येतो.

iii. सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या अवसादामुळे निर्माण झालेला हा जलोढ मैदानी प्रदेश आहे.

iv. पश्चिमेकडे राजस्थान ते पूर्वेकडे आसामच्या खोऱ्यापर्यंत या प्रदेशाचा विस्तार आहे.

v. या प्रदेशाची लांबी २४०० किलोमीटर, तर रुंदी १५० ते ५०० किलोमीटर अशी आहे. याची सरासरी उंची १५० मीटर आहे.

vi. या प्रदेशाने ६,७७,६३८ चौकिमी इतके क्षेत्र व्यापले आहे.

vii. उत्तरेकडील मैदानी प्रदेशाचे तीन भागांत विभाजन होते.

अ. राजस्थान - वाळवंट

ब. पश्चिम मैदान (पंजाब-हरियाणा)

क. गंगेचा मैदानी प्रदेश - मध्यवर्ती मैदान, त्रिभुज प्रदेश व पूर्वीय मैदान.

**२. राजस्थान मैदानाचे स्थान आणि विस्तार**

**उत्तर:** i. राजस्थानच्या मैदानी प्रदेशाला भारतीय महावाळवंट असे म्हणतात.

ii. हे जगातले सातवे मोठे वाळवंट आहे.

iii. भारताच्या वायव्येकडील महत्त्वाचा भाग या प्रदेशात येतो.

iv. ‘मरुस्थळ’ या नावाने ओळखला जाणारा राजस्थानचा वाळवंटी प्रदेश. हा अरवली पर्वताच्या पश्चिमेला आहे. राजस्थानच्या पश्चिमेकडील जैसलमेर, बारमेर, जोधपूर आणि बिकानेर जिल्ह्यांत हा प्रदेश पसरलेला आहे.

**३. राजस्थान मैदानाची भूरचना**

**उत्तर:** i. प्राचीन काळी पश्चिम राजस्थान सागरव्याप्त होता. त्यामुळे या भागात समुद्रातील रेती आढळते.

ii. दीर्घकाळ अवर्षण आणि कोरडे वारे यांमुळे या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर वाळूचे संचयन झालेले दिसते.

iii. खडकांच्या अपक्षयामुळे ही वाळू निर्माण झाली आहे. फेल्डस्पारच्या कणांची तसेच स्फटिकांची ही वाळू बनली आहे.

iv. येथे वाऱ्याचा वेग विलक्षण असतो आणि त्यामुळे घर्षणाने वाळूचा आकार एकसारखा गोल होतो.

v. या प्रदेशात चुनखडक, जिप्सम आणि मीठ ही खनिजे सापडतात.

## ३.१ प्राकृतिक रचना

***४. मरुस्थळाची प्राकृतिक रचना** **[जुलै १६]**

**उत्तर:** i. राजस्थानचे वाळवंट मरुस्थळ या नावाने ओळखले जाते.

ii. मरुस्थळ हे कच्छच्या रणापासून ते पंजाबपर्यंत पसरले आहे.

iii. हा पट्टा सुमारे ६५० किमी लांब आणि सुमारे ३०० किमी रुंद पसरला आहे. पश्चिम राजस्थानातील ८ जिल्ह्यांनी हा प्रदेश व्यापला आहे.

iv. स्थान बदलणाऱ्या वालुकागिरी, विषम हवामान स्थिती, विरळ झाडी आणि कमी लोकवस्ती ही या प्रदेशाची वैशिष्ट्ये आहेत.

v. वालुकागिरीचा आकार, विस्तार आणि वाऱ्याची दिशा यांनुसार वालुकागिरींची वर्गवारी सैफ किंवा बारखाण या दोन प्रकारांत केली जाते. या टेकड्या त्यांचा आकार आणि वनाच्छादन यांनुसार जागा बदलतात.

vi. या प्रदेशातील बिकानेर जिल्ह्यात मिठाची दोन सरोवरे आहेत.

vii. जैसलमेर, बारमेर आणि बिकानेर येथील खडकाळ प्रदेशात चुनखडक आणि वालुकाश्म खडक विपुल प्रमाणात आढळतात.

## ५. राजस्थान बागर

उत्तर: i. राजस्थानच्या मैदानी प्रदेशाच्या पूर्वेकडील अंशत: शुष्क प्रदेश 'बागर' म्हणून ओळखला जातो.

ii. बागर प्रदेशाच्या आग्नेयेकडून वाहणाऱ्या लुनी नदीमुळे घळई अपक्षरण झाले आहे.

iii. ही जमीन म्हणजे किंचित लाटांप्रमाणे दिसणाऱ्या वाळूचा निक्षेप आहे.

iv. या भागाचा उत्तरेकडील प्रदेश शेखावती प्रदेश म्हणून ओळखला जातो. यामध्ये मिठाची अनेक सरोवरे आहेत. उदा. देगना, सांभर इत्यादी.

v. या प्रदेशाच्या अतिउत्तरेला घग्गर नदीचा मैदानी प्रदेश आहे. घग्गर नदी या प्रदेशातच लुप्त झालेली आहे.

## ३.३ मृदा

**६. राजस्थानच्या मैदानी प्रदेशामधील मृदेची वैशिष्ट्ये आणि प्रकार**

**उत्तर:** i. राजस्थानच्या मैदानी प्रदेशातील मृदा सर्वसाधारणपणे वालुकामय आहे.

ii. या मृदेमध्ये ९० टक्के रेती असते.

iii. ही मृदा सुपीक; परंतु कोरडी आहे.

iv. या प्रदेशात मृदेचे चार प्रकार दिसून येतात: लवणयुक्त वाळवंटातील मृदा, तांबडी वाळवंटी मृदा, पिवळी-तपकिरी वालुकामय मृदा आणि जलोढ मृदा.

v. लुनी खोरे आणि घग्गर नदीच्या मैदानी प्रदेशात जलोढ मृदा आढळते.

## ३.४ नैसर्गिक वनसंपत्ती आणि प्राणिजीवन

***७. राजस्थान वाळवंटातील वन्यजीवन**

**उत्तर:** i. राजस्थानच्या वाळवंटातील वन्यजीवन, येथील वैविध्यपूर्ण अधिवास आणि परिसंस्थेमुळे जगातील इतर वाळवंटी प्रदेशांच्या तुलनेत खूपच समृद्ध आहे.

ii. अनेक जातीच्या पाली आणि साप येथे आढळतात.

iii. काही वन्य प्राण्यांच्या जाती जसे काळवीट, चिंकारा ज्या भारताच्या इतर भागात नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्या या वाळवंटी प्रदेशात मात्र मोठ्या प्रमाणावर आढळतात.

iv. या प्राण्यांत जगण्यासाठी उत्तम नैसर्गिक क्षमता विकसित झाली आहे. इतर प्राण्यांपेक्षा वाळवंटातील प्राणी आकाराने छोटे असतात आणि प्रामुख्याने निशाचर असतात.

v. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात स्थलांतरित व निवासी पक्ष्यांच्या सुमारे १४० जातींचा अधिवास आहे. गरुड, बहिरी ससाणा, खरूची आणि गिधाड हे पक्षी येथे आढळतात.

vi. भारतीय रानकोंबडा हा राजस्थानच्या वाळवंटातील निवासी पक्षी आहे.

vii. भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर हादेखील राजस्थानच्या वाळवंटात आढळतो.

## ३.५ लोकसंख्या आणि वसाहती

**८. राजस्थान वाळवंटातील लोकसंख्या.**

**उत्तर:** i. प्रतिकूल हवामान आणि अपुऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीमुळे या भागात लोकसंख्या विरळ आहे.

ii. राजस्थानच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ३८ टक्के लोकसंख्या राजस्थानच्या वाळवंटात आढळते.

iii. गेल्या काही वर्षांत येथील लोकसंख्या वाढली आहे. येथील लोकांचे राहणीमान निम्न स्तराचे आहे. वाळवंटातील लोकांचे मुख्य व्यवसाय शेती आणि पशुपालन हे आहेत.

iv. जगातील इतर वाळवंटी प्रदेशांच्या तुलनेत राजस्थानचे वाळवंट हे जगातील दाट लोकवस्तीचे वाळवंट आहे. येथील लोकसंख्येची घनता दर चौकिमीला ८३ व्यक्ती इतकी आहे.

v. याचे कारण असे, की हा दाट लोकवस्ती असलेल्या पूर्वेकडील गंगेचे खोरे आणि पश्चिमेकडील सिंधू नदीचे खोरे यांमधील संक्रमण पट्टा आहे.

vi. येथील लोकांची संस्कृती, वारसा, परंपरा, लोककथा, नृत्य व संगीत समृद्ध आणि बहुरंगी आहे.

## ३.६ आर्थिक विकास

***९. राजस्थान वाळवंटातील शेती.**

**उत्तर:** i. राजस्थानच्या वाळवंटातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आणि पशुपालन आहे.

ii. जलसिंचनाच्या अभावामुळे येथे अनिश्चित शेती आहे.

iii. बाजरी, कडधान्ये, ज्वारी, मका, तीळ, भुईमूग इ. खरीप पिके प्रामुख्याने खरीप हंगामात घेतली जातात.

iv. गेल्या काही दशकात कालवे, कूपनलिका इत्यादींच्या विकासामुळे येथील शेती पद्धती बदललेली आहे.

v. या कारणामुळे राजस्थानातील काही जिल्हे रब्बी पिकेदेखील घेतात. त्यामध्ये गहू, मोहरी, जिरे आणि कापूस इ. पिके घेतली जातात.

vi. वायव्य राजस्थानातील काही भाग इंदिरा गांधी कालव्याच्या जलसिंचनाखाली येतो. या कालव्यामुळे वाळवंटाचे हरित शेतीत रूपांतर झाले आहे.

vii. जलसिंचनाखालील जिल्ह्यातील जवळजवळ ४०% ते ६०% क्षेत्र लागवडीखाली आले आहे. यामध्ये विशेषत: जोधपूर व गंगानगर जिल्हे येतात.

viii. दुसऱ्या बाजूला राजस्थानच्या वाळवंटाच्या पश्चिम भागात लागवडीखालील क्षेत्राची टक्केवारी अत्यल्प आहे.

**१०. राजस्थानमधील जलसिंचन.**

**उत्तर:** i. जलसिंचनाच्या अभावामुळे येथे अनिश्चित शेती आहे.

ii. येथील विहिरी ३० मीटर ते १२० मीटर इतक्या खोलीच्या असतात. त्यातील पाणी नेहमीच मचूळ आणि लवणयुक्त असते.

iii. गोड्या पाण्याच्या विहिरीचे प्रमाण अत्यल्प आहे.

iv. अरवलीच्या पश्चिम सीमांत भागात जास्त पर्जन्यमान आणि भूमिगत जलसाठे आहेत. येथे मर्यादित विहिरी आणि कालवे जलसिंचन उपलब्ध आहे.

v. वायव्य राजस्थानातील काही भाग इंदिरा गांधी कालव्याच्या जलसिंचनाखाली येतो. या कालव्यामुळे वाळवंटाचे हरित शेतीत रूपांतर झाले आहे.

**११. राजस्थानमधील उद्योगधंदे.**

**उत्तर:** i. बिकानेर ही जगातील सर्वांत मोठी लोकरीची बाजारपेठ आहे. तसेच लोकरीचे धागे व गालिचा तयार करण्याचे केंद्र आहे.

ii. कातडी कमविणे आणि लोकर उद्योग हे येथील प्रमुख उद्योग आहेत.

iii. मारवाड शहरात अनेक कापडगिरण्या आहेत.

iv. जैसलमेर येथे खनिजसंपत्ती व पर्यटनावर आधारित अनेक उद्योग विकसित झाले आहेत.

v. जोधपूर येथे कापडगिरण्या, धातुकाम, शाई, खेळाचे साहित्य, गालिचे, अभियांत्रिकी आणि वाहन उद्योगांचे केंद्रीकरण झाले आहे.

**१२. राजस्थानमधील वाहतूक.**

**उत्तर:** i. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात रस्ते, लोहमार्ग आणि हवाईमार्ग आहेत.

ii. या प्रदेशातून दिल्ली-मुंबई हा राष्ट्रीय महामार्ग जातो.

iii. खासगी व सरकारी राज्य वाहतूक महामंडळाच्या बसेसद्वारे प्रवासी वाहतूक केली जाते.

iv. या प्रदेशातील प्रमुख शहरे लोहमार्गाने परस्परांना जोडली आहेत.

v. या प्रदेशातील बहुतेक लोहमार्ग मीटर गेज आहेत.

vi. राजस्थानातील प्रसिद्ध पर्यटनस्थळांना भेट देणारी आरामदायी आणि विशेषत: परदेशी पर्यटकांचे आकर्षण असणारी रेल्वे या प्रदेशातून जाते.

vii. जोधपूर हे प्रदेशातील पर्यटन आणि व्यापाराचे केंद्र असून येथे विमानतळ आहे.

*१३. उंट सफारी. [जुलै १५]

**उत्तर:** i. राजस्थानच्या वाळवंटात उंटावरील जगप्रसिद्ध सफरींचा आनंद लुटण्याची संधी पर्यटकांना मिळते.

ii. जैसलमेर, बिकानेर आणि जोधपूर ही ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध पर्यटनस्थळे येथे आहेत.

iii. राजस्थानच्या वाळवंटातील पर्यटन व्यवसायामुळे अनेक पर्यटन आयोजक, उंटांचे मालक यांना रोजगार मिळत आहे.

iv. देशातील तसेच विदेशी पर्यटक उंटावरील सफरींचा अनुभव घेण्यासाठी वारंवार राजस्थानच्या वाळवंटाला भेट देतात.

## ३.७ पर्यावरणीय समस्या आणि नैसर्गिक आपत्ती

### १४. राजस्थान वाळवंटातील नैसर्गिक आपत्ती

**उत्तर:** i. राजस्थानच्या वाळवंटातील वार्षिक पर्जन्यमान अत्यल्प असल्यामुळे संपूर्ण वर्षभर येथे पाण्याचे दुर्भिक्ष्य असते.

ii. या प्रदेशात दरवर्षी पर्जन्यमानात खूपच अनिश्चितता आढळते.

iii. या प्रदेशातील शेती अस्थिर आहे; कारण सरासरी प्रत्येक दहा वर्षांत चार वर्षे दुष्काळाची असतात.

iv. वाळवंटी प्रदेशाच्या मोठ्या भागावरून वर्षातील ४ ते ५ महिने जोरदार वारे वाहत असतात.

v. उन्हाळ्यातील उष्ण धुळीची वादळे हे राजस्थानच्या वाळवंटाचे सर्वसाधारण वैशिष्ट्य आहे. या वादळांना 'आँधी' म्हणतात.

vi. वाळवंटाचे विस्तृतीकरण ही आजूबाजूच्या प्रदेशांच्या दृष्टीने गंभीर समस्या आहे.

vii. वाळवंटाच्या विस्तृतीकरणामुळे शेतीचे क्षेत्र कमी होत आहे.

## प्र.४. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा.

### ३.३ मृदा

**१. वालुकागिरीची वाळवंटांतर्गत स्थिती बदलत राहते, कुंपणे बुजतात, रस्ते व रेल्वेमार्गांत अडथळे निर्माण होतात, ही राजस्थानातील मोठी समस्या आहे.**

**उत्तर:** i. वाळवंटातील मृदा वालुकामय, सुपीक; परंतु कोरडी आहे.

ii. ती वाऱ्याच्या अपक्षरण कार्याला पूरक असते.

iii. एकाच दिशेने वाहणारे जोरदार वारे वाळवंटातील मृदा वाहून शेजारील सुपीक जमिनीवर नेतात.

iv. यामुळे वालुकागिरीची वाळवंटांतर्गत स्थिती बदलत राहते, कुंपणे बुजतात, रस्ते व रेल्वेमार्गांत अडथळे निर्माण होतात.

### ३.४ नैसर्गिक वनसंपत्ती आणि प्राणिजीवन

**२. राजस्थानच्या वाळवंटात विदेशी जातीच्या वृक्षांची लागवड करणे आवश्यक आहे.**

**उत्तर:** i. वाळवंटातील प्रदेशात लागवड करण्यायोग्य स्थानिक वृक्षांच्या जाती अतिशय कमी आहेत.

ii. त्यामुळे वाळवंटात तग धरणाऱ्या विदेशी वृक्षांच्या जातींची या प्रदेशात लागवड करण्यात आली आहे.

iii. वाळवंटीकरण रोखण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

iv. उदा. जोजोबा, इस्रायली बाभूळ.

## ३.५ लोकसंख्या आणि वसाहती

***३. राजस्थानचे वाळवंट हे जगातील सर्वांत जास्त लोकसंख्येची घनता असलेले वाळवंट आहे. [मार्च १६]**

**उत्तर:** i. राजस्थानचे वाळवंट हा दाट लोकवस्ती असलेल्या पूर्वेकडील गंगेचे खोरे आणि पश्चिमेकडील सिंधू नदीचे खोरे यांमधील संक्रमण पट्टा आहे.

ii. येथील लोकसंख्येची घनता दर चौकिमी ला सुमारे ८३ व्यक्ती इतकी आहे.

iii. यामुळे राजस्थानचे वाळवंट हे जगातील सर्वांत जास्त लोकसंख्येची घनता असलेले वाळवंट आहे.

iv. जोधपूर, बिकानेर, जैसलमेर इ. राजस्थानमधील प्रमुख मोठी शहरे आहेत.

***४. पर्जन्य जलसंचयन राजस्थानमध्ये खूप महत्त्वाचे आहे.**

**उत्तर:** i. पर्जन्य जलसंचयन म्हणजे पावसाचे पाणी साठवून ठेवणे व नंतर त्याला उपयोगात आणणे.

ii. राजस्थानच्या वाळवंटातील वार्षिक पर्जन्यमान २५० मिमी इतके अत्यल्प आहे.

iii. पश्चिम राजस्थानात पाण्याच्या समस्येचे कारण अत्यल्प पाऊस, अतिखोल भूजल आणि नद्या व कालवे या जलस्त्रोतांचा अभाव हे आहे.

iv. या समस्येचा सामना करण्यासाठी खेड्यातील लोक कुंड (टाक्या), जोहड (तळी), कायमस्वरूपी तलाव, यांचे बांधकाम व नूतनीकरण आणि विहिरी खोदण्यास त्याचप्रमाणे खादिन, टंका, कुई यांसारख्या पावसाचे पाणी साठवून ठेवण्याच्या परंपरागत स्त्रोतांना राजस्थानमधील लोक प्रोत्साहन देत आहेत.

v. यांमधील पाण्याचे बाष्पीभवनाचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे त्यात दीर्घकाळ पाणी साठून राहते.

म्हणूनच, पर्जन्य जलसंचयन हे पाण्याच्या दुष्काळाच्या समस्येचा सामना करण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

## ३.६ आर्थिक विकास

***५. राजस्थानच्या वाळवंटातील शेतकरी पशुपालनावर अवलंबून असतात. [मार्च १४]**

**उत्तर:** i. राजस्थानमधील शेतकऱ्यांना शेतीवर पूर्णपणे अवलंबून राहता येत नाही.

ii. राजस्थानच्या वाळवंटातील उन्हाळ्यातील तापमान ५०° सें. असते, तसेच तेथील पाऊस अत्यल्प व

अनिश्चित असून सरासरी वार्षिक पर्जन्यमान २५० मिमी पेक्षा कमी आहे.

iii. या शुष्क व दुष्काळप्रवण क्षेत्रात पशुपालन हा सर्वांत योग्य व्यवसाय आहे.

iv. वाळवंटातील बराचसा भाग पीक लागवडीच्या दृष्टीने शुष्क आहे; परंतु तेथे कुरणे आहेत.

v. राजस्थानच्या वाळवंटात गायी, म्हशी, मेंढ्या, शेळ्या व उंट बहुसंख्येने आढळतात.

vi. या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर आयोजित केल्या जाणाऱ्या गुराढोरांच्या जत्रांवरून पशुपालन हे येथील लोकांच्या उपजीविकेच्या दृष्टीने महत्त्वाचे साधन आहे हे लक्षात येते.

***६. राजस्थानचे वाळवंट पर्यटकांना आकर्षित करते.**

**[ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** i. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात वालुकागिरीच्या रांगा पसरलेल्या आहेत. या प्रदेशात जगप्रसिद्ध अशा उंटावरील सफरींचा आनंद लुटण्याची संधी पर्यटकांना मिळते.

ii. जैसलमेर, बिकानेर आणि जोधपूर ही ऐतिहासिकदृष्ट्या फार प्रसिद्ध नगरे असून राजस्थानातील प्रसिद्ध पर्यटनस्थळे आहेत.

iii. देशातील तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटक, पाठीवर सामान घेऊन निघालेल्या प्रवाशांसाठी स्वस्त पदयात्रा ते महागड्या पदयात्रा, ज्यामध्ये अरेबियन नाईटसारखे तंबूचे तळ, तसेच थाटाच्या मेजवान्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण यांसारखे भरगच्च कार्यक्रम असतात.

iv. या पदयात्रांदरम्यान राजस्थानच्या वाळवंटातील नाजूक आणि वेगळ्या परिसंस्था पर्यटकांना पाहण्यास मिळतात.

या सर्व कारणांमुळे राजस्थानचे वाळवंट पर्यटकांना आकर्षित करते.

## प्र.५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

### ३.२ हवामान

**१. राजस्थानातील वाळवंटी प्रदेशातील हवामानाबद्दल सविस्तर माहिती लिहा.**

**उत्तर:** i. राजस्थान हा भारतातील सर्वात उष्ण हवामानाचा प्रदेश आहे.

ii. येथे दिवसा तापमान जास्त असते आणि रात्री तापमान कमी असते.

iii. हिवाळ्यातील तापमान ०° सेल्सिअस आणि उन्हाळ्यातील तापमान ५०° सेल्सिअस असते. म्हणजे वार्षिक तापमान कक्षा ५०° सेल्सिअस असते.


iv. वाऱ्याचा वेग सरासरी ३० किलोमीटर प्रति- ताशी असतो, त्यामुळे पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होते.

v. राजस्थानच्या वाळवंटात पाऊस अत्यल्प व अनिश्चित स्वरूपाचा असतो. येथील वार्षिक पर्जन्य २५० मिमी पेक्षा कमी असते.

vi. पूर्वेकडून पश्चिमेकडे पर्जन्यमान कमी होत जाते. बहुतांश पाऊस जुलै व ऑगस्ट महिन्यात पडतो. जैसलमेरचा काही भाग बहुतेक वेळा पर्जन्याविना राहतो.

vii. अत्यल्प पाऊस आणि बाष्पीभवनाचे जास्त प्रमाण यांमुळे येथील भूजलाची खोली ५० ते १५० मीटर असते, तसेच येथील पाणी क्षारयुक्त असते.

viii. येथील लोकांनी तापमानातील अतिबदल आणि सतत पाण्याचा तुटवडा या परिस्थितींशी जुळवून घेतले आहे.



भारत
उ
राजस्थान वाळवंटी प्रदेश
बंगालचा उपसागर
अरबी समुद्र
लक्षद्वीप बेटे
अंदमान व निकोबार बेटे
हिंदी महासागर
सूची:
कमी पर्जन्य प्रदेश

*** २. राजस्थानच्या मैदानी प्रदेशातील नैसर्गिक वनस्पतीविषयी सविस्तर माहिती लिहा.**

**उत्तर:** i. राजस्थानच्या मैदानी प्रदेशातील वनसंपत्तीला 'उत्तर वाळवंटातील काटेरी वन' असे म्हणतात.

ii. हा संपूर्ण प्रदेश मोठ्या प्रमाणात वालुकामय असून, या प्रदेशात उघडे खडक दिसतात.

iii. या प्रदेशात झाडांचे आच्छादन अगदी विरळ असून छोटे वृक्ष अत्यल्प प्रमाणात आढळतात.

iv. राजस्थानमधील वनांचे समूह पर्जन्यमानानुसार पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जातात.

v. राजस्थानच्या वाळवंटातील नैसर्गिक वनसंपत्तीत झाडे, झुडुप व वनौषधीच्या प्रजातींची संख्या जास्त आहे. बरेच मोठे क्षेत्र खुरट्या काटेरी आणि वाढ खुंटलेल्या झाडांनी व्यापले आहे.

vi. अत्यल्प पर्जन्यमानामुळे झाडे बुटकी व खुंटलेल्या स्वरूपात आढळतात.

vii. खिप झुडूप म्हणजे पर्णविरहित लांब सुईसारख्या फांद्या असलेले हे झाड वालुकामय मृदेमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते.


viii. खैर, फोग, बेरी, खेजरी आणि निवडुंग या सदाहरित झुडपांचे बऱ्याच मोठ्या क्षेत्रावर आच्छादन आहे.

ix. बाभूळ हा उत्तम पशुखाद्य असलेला वृक्ष या प्रदेशात आढळतो आणि शुष्क हवामानात व वालुकामय परिस्थितीतदेखील हा वृक्ष चांगला वाढतो.

x. वाळवंटात तग धरणारे विदेशी वृक्ष जसे निलगिरी, ॲकॅशिया आणि कॅशिया जातींची लागवड करण्याचे प्रयत्न राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात केले आहेत.

xi. वाळवंटातील वनीकरणासाठी इस्रायली बाभूळ वृक्ष उपयुक्त ठरला आहे.

xii. जोजोबा हा वृक्ष लागवडीसाठी आर्थिकदृष्ट्या योग्य असून या वृक्षाच्या बियांपासून तेलनिर्मिती करण्यासाठी व्यापारी तत्त्वावर लागवड केली जाते. राजस्थानच्या वाळवंटातील वाळवंटीकरण रोखण्यासाठी जोजोबा वनस्पती उपयुक्त आहे.


भारत
उ
राजस्थान मैदानी प्रदेश
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
लक्षद्वीप बेटे
अंदमान व निकोबार बेटे
हिंदी महासागर

***३. राजस्थानमधील जलसंचयनाच्या पारंपरिक पद्धती लिहा. [ऑक्टोबर १४, जुलै १५]**

**उत्तर:** i. अतिखोल भूजल आणि नद्या व कालवे या जलस्त्रोतांचा अभाव यांमुळे पश्चिम राजस्थानात पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे.

ii. या समस्येचा सामना करण्यासाठी खेड्यातील लोक कुंड (टाक्या), जोहड (तळी), तलाव यांचे बांधकाम व नूतनीकरण व त्याचप्रमाणे विहिरी खोदण्यास प्रोत्साहन देत आहेत.

iii. राजस्थानच्या वाळवंटातील लोक परंपरेने पावसाचे पाणी साठवत आले आहेत.

iv. पावसाचे पाणी पिण्यासाठी कुंडांमध्ये साठवले जाते.

v. राजस्थानमध्ये परंपरागत पायऱ्यांच्या विहिरीला बावडी म्हणतात.

vi. पृष्ठभागावरून वाहणारे पाणी शेतीसाठी साठवून ठेवण्याचा बांधकामाचा एक नामी नमुना म्हणजे 'खादिन' होय.

vii. खादिन म्हणजे रेतीयुक्त टेकडीच्या उतारावर लांब (१००-३०० मीटर) आडवा बांध बांधतात.

viii. टंका म्हणजेच भूमिगत छोट्या टाक्या होय. या टाक्यांमध्ये पावसाचे पाणी साठवले जाते. बिकानेरमधील बहुतेक घरांमध्ये किंवा अंगणात टंका परंपरेने आढळतात.

ix. या टाक्या जमिनीला वर्तुळाकार छिद्र करून चुनखडक लावून बांधतात व कडेने फरश्यांनी सुंदर सजवल्या जातात. त्यामुळे पाणी थंड राहते. हे पाणी पिण्यासाठी योग्य असते.

x. झिरपणारे पाणी गोळा करण्यासाठी टाक्यांजवळ १०-१२ मीटर खोल खड्डे खणले जातात, त्याला कुई असे म्हणतात. अल्प पावसाच्या ठिकाणी पावसाचे पाणी साठविण्यासाठी कुई वापरतात.

xi. त्यातील पाण्याचे बाष्पीभवन प्रमाण अत्यल्प असल्याने त्यात दीर्घकाळ पाणी साठून राहते.

[प्रश्न क्र. ५(२) चा नकाशा पाहावा.]

***४. राजस्थानमध्ये लोकर उद्योगाचा विकास का झाला आहे? [मार्च १४]**

**उत्तर:** i. राजस्थानच्या वाळवंटातील अनेक शेतकरी उपजीविकेसाठी 'पशुपालन' करतात.

ii. राजस्थान हा भारतातील सर्वांत मोठा लोकर उत्पादक प्रदेश आहे.

iii. पशुपालनाबरोबरच तेथे विविध जातींच्या मेंढ्या आढळत असल्याने लोकर उद्योगाचा विकास झाला आहे.

iv. चोकला, मारवाडी, मालपुरी आणि पुंगल जातीच्या मेंढ्या राजस्थानात आढळतात.

v. चोकला या संकरित जातीच्या मेंढीची लोकर उच्च प्रतीची समजली जाते.

vi. देशातील एकूण लोकर उत्पादनापैकी ४०% ते ५०% लोकर राजस्थानातून तयार होते.

vii. सुरतगड व बिकानेर येथे 'मेरिनो' जातीच्या मेंढीची 'पैदास केंद्रे' आहेत.

viii. जोधपूर व बिकानेर येथे लोकरीचा धागा निर्मिती करणाऱ्या गिरण्या आहेत.

या सर्व कारणांमुळे राजस्थानमध्ये लोकर उद्योग विकसित झाला आहे.

**५. राजस्थानमधील खाणउद्योगांच्या विकासाची माहिती द्या.**

**उत्तर:** i. राजस्थान विशेषत: दगड काढणे आणि खाणकाम यासाठी महत्त्वाचे आहे.

ii. राजस्थान राज्य हे सिमेंटसाठी भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा स्रोत आहे.

राजस्थानात आढळून येणारी महत्त्वाची खनिजे पुढीलप्रमाणे:

**अ. वालुकाश्म दगड:**

हा दगड प्रामुख्याने ऐतिहासिक वास्तू, महत्त्वाच्या इमारती, निवासी इमारती बांधण्यासाठी वापरतात. हा दगड जोधपूर आणि नागौर या जिल्ह्यांत आढळतो.

**ब. लिग्नाइट:**

बारमेर, बिकानेर व नागौर जिल्ह्यात लिग्नाइट कोळशाचे साठे आढळतात. बारमेर जिल्ह्यातील गिरलमध्ये लिग्नाइटवर आधारित आण्विक ऊर्जा केंद्रनिर्मिती झाली आहे. अनेक उद्योगसंस्था वीजनिर्मितीसाठी नियोजन करत आहेत.

क. **पेट्रोलिअमचे साठे:**

जैसलमेर आणि बारमेर जिल्हे पेट्रोलिअमचे साठे असलेली मुख्य ठिकाणे आहेत. या साठ्यांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेत बदल होण्याची खात्री निर्माण झाली आहे.

ड. **नैसर्गिक वायू:**

जैसलमेर खोऱ्यात १९८८ मध्ये 'ऑईल इंडिया लिमिटेड' या कंपनीने नैसर्गिक वायू शोधून काढला.

[प्रश्न क्र. ५(२) चा नकाशा पाहावा.]

## प्र.६. नकाशा वाचन

**भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक २४ वरील आकृती क्र.३.१ चे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. **राजस्थानच्या मैदानी प्रदेशातील पश्चिमेला कोणता भाग आहे?**

**उत्तर**: राजस्थानच्या मैदानी प्रदेशाच्या पश्चिमेला मरुस्थळ हा भाग आहे.

**२. नकाशावर कोणती नदी दिसत आहे?**

**उत्तर:** नकाशावर लुनी नदी दिसत आहे.

**३. राजस्थानच्या मैदानी प्रदेशाच्या पूर्वेला कोणत्या पर्वतरांगा आहेत?**

**उत्तर:** राजस्थानच्या मैदानी प्रदेशाच्या पूर्वेला अरवली पर्वतरांगा आहेत.

**४. नकाशा काय दर्शवितो?**

**उत्तर:** हा नकाशा राजस्थान मैदानी प्रदेशाची प्राकृतिक भूरचना दर्शवितो.

**५. कोणता प्रदेश मरुस्थळ आणि अरवली पर्वतांच्या मध्यभागी आढळून येतो?**

**उत्तर:** मरुस्थळ आणि अरवली पर्वतांच्या मध्यभागी बागर प्रदेश आढळून येतो.

**६. अरवली पर्वताची उंची किती आहे?**

**उत्तर:** अरवली पर्वताची उंची साधारण ४०० मीटरपेक्षा जास्त आहे.

**प्र.७. भारताच्या नकाशा आराखड्यात खालील बाबी दाखवा आणि त्यांना नावे द्या. (सूची आवश्यक)**


अ. *१. **मरुस्थळ किंवा राजस्थानचे वाळवंट** [मार्च १४]

२. **इंदिरा गांधी कालवा**

*३. **अरवली पर्वत** [जुलै १६]

*४. **लुनी नदी**

**उत्तर:** खालील नकाशात वरील बाबी दर्शविल्या आहेत.





**ब.** *१. **बागर** २. **उदयपूर**

*३. **जैसलमेर** ४. **बिकानेर**

५. **जयपूर**

**उत्तर:** खालील नकाशात वरील बाबी दर्शविल्या आहेत.


भारत
उ.
० २०० ४०० किमी
(४)
(५)
(३)
(१)
(२)
बंगालचा उपसागर
अरबी समुद्र
हिंदी महासागर
सूची:
(१) बागर
(२) उदयपूर
(३) जैसलमेर
(४) बिकानेर
(५) जयपूर